## प्रकरण चौथे

# ३ रे सरसंघचालक बाळासाहेब देवरस

## प्रकरण चौथे

# ३ रे संघचालक बाळासाहेब देवरस

संघाचे तृतीय संघचालक बाळासाहेब देवरस यांचे नांव मधूकर दत्तात्रय देवरस त्यांचा जन्म ११ डिसेंबर १९१५ या दिवशी नागपुरला झाला त्यांचे वडील दत्तात्रय देवरस हे महसुल खात्यात शासकीय अधिकारी होते.[१]

डॉक्टरांनी १८२५ ला संघाची शाखा सुरू केली व १२ वर्षाचे बाळासाहेब १९२७ ला त्या शाखेत जावू लागले त्यानंतर ते शाखेचे गटनायक , मुख्यशिक्षक कार्यवाह अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या बाळासाहेबांचे लहान बंधु भाऊराव सुध्दा संघ शाखेत येवू लागले.[२]

बाळासाहेब १९३७ ला पुण्याच्या संघशिक्षा वर्षाचे मुख्यशिक्षक झाले त्यावेळी वय २२ वर्षे होते १९३९ च्या सिंदी येथे झालेल्या बैठकीस बाळासाहेब उपस्थित होते. त्यानंतर त्यांना प्रचारक म्हणून आजारपणावेळी कलकत्त्याला पाठविण्यात आले.[३]

१९४० मध्ये डॉक्टरांच्या आजारपणावेळी कलकत्त्याला बाळासाहेबांना कलकत्त्याहून बोलावून घेण्यात आले. गुरूजींनी सरसंघचालक पदाचा स्विकार केल्यावर प्रांताप्रांतातून प्रचारक पाठवून संघकार्याचा वेगाने विस्तार करण्यास प्रारंभ झाला पण बाळासाहेबांना नागपूरमध्येच ठेवण्यात आले कारण केंद्र शाखा या नात्यांने नागपूरवर एक विशेष जबाबदारी येते. मुख्यशिक्षक ते प्रचारक पाठवण्यापर्यंतची सर्व जबाबदारी नागपूरवर होती. व ती सर्व जबाबदारी बाळासाहेब पहात होते.[४]

१९४३ला पुण्याच्या संघशिक्षा वर्गात बाळासाहेबांचा परीचय करून देताना गुरुजींनी म्हटले ज्यांनी डॉक्टरांना पाहीले नसेल त्यांनी बाळासाहेबांकडे पहावे डॉक्टर कसे होते हे त्यांच्याकडे पाहिल्यावर कळेल अशा अनेक घटना आहेत की ज्यामुळे गुरुजी आपल्यानंतर बाळासाहेबाच्या खांद्यावर सरसंघचालक पदाचा भार टाकणार होते हे लक्षात येते. १९४४ ला रेशीमबाग संघस्थानावर एका उत्सवांसाठी गुरूजी व कृष्णराव मोहरील टांग्यातून चालले होते. त्याचवेळी तीन चार स्वयंसेवकांबरोबर बाळासाहेबही तिकडे चाललेले होते त्यांना पाहून गुरूजी कृष्णराव मोहरील यांना म्हणाले , खरे संघचालक पायी चालले आहेत आणि नकली टांग्यातून यावरूनच बाळासाहेबांची योग्यता सिध्द होते तसेच १९४७ ला पारडी येथे शिबीर झाले त्या शिबीरात बाळासाहेबांचा बौध्दिक वर्ग होता तेव्हा त्यांचा परिचय करून देताना गुरूजी म्हणाले, ज्यांच्यामुळे मी सरसंघचालक म्हणून ओळखला जातो ते हे बाळासाहेब देवरस.[५]

१९६० मध्ये बाळासाहेब नागपूर कार्यवाह झाले. १९६५ ला सहकार्यवाह असलेल्या भैय्याजी दाणीच्या निधनानंतर त्यावेळी बैठकीत बोलताना गुरूजी म्हणाले., एकावेळी दोन सरसंघचालक असू शकत नाहीत म्हणून बाळासाहेब सहकार्यवाह आहेत यावरून गुरुजींच्या मनात बाळासाहेबांविषयी कोणती धारणा होती हे लक्षात येते.[६]

### संघावरील दुसरी बंदी :-

१९७४ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहीलेल्या संपूर्ण क्रांतीच्या चळवळीला विद्यार्थी परिषदेने संपूर्ण पाठिंबा दिला कालांतराने संघानेही पाठिंबा दिला.[७] राजनारायण यांनी इंदिरा गांधीच्या संसदेवरील निवडी विरूध्द दाखल केलेल्या खटल्याचा निकाल १२ जून १९७५ ला लागला अलाहबाद उच

न्यायालयाचे न्यायाधिश जगमोहन लाल यांनी इंदिराजींची निवड अवैध ठरवली आणि पुढील सहावर्षे त्यांना निवडणुकीसाठी उभे राहता येणार नाही असा निर्णय दिला २० जूनला इंदिराजींनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला इंदिराजींना सत्ता सोडावी लागणार हे स्पष्ट होते. म्हणून त्यांनी २६ जूनला रा.स्व. संघावर बंदीही घातली व ३० जूनला बाळासाहेबांना अटक केली संघाचे इतर कार्यकर्ते भूमिगत झाले. आणीबाणीच्या विरोधात राष्ट्रव्यापी सत्याग्रह करण्याचे संघाने ठरविले.

आणीबाणीविरूध्द सत्याग्रहाची मोहीम १४ नोव्हेंबर १९७५ ला या दिवशी सुरू झाली पहिल्या काही दिवसात ५००० स्वयंसेवकांना मिसा खाली स्थानबध्द केले नंतर संख्या २५००० वर गेली आणीबाणीत ही सत्याग्रह करून १ लाख लोक तुरूगांत गेले त्यातील ८० हजार सत्याग्रही संघपरिवारातील होते.

जे संघ कार्यकर्ते तुरूंगात गेले नव्हते ते भूमीगत राहून आर्थिक दृष्टया गरीब असलेल्या सत्याग्रही स्वयंसेवकाच्या घरी आर्थिक मदत पुरवण्याचे सरकार विरोधात छापलेली पत्रके वाटण्याचे काम करीत होते. १९ महिने ही आणीबाणी राहिली १८ जानेवारी १९७७ ला इंदिराजींनी आकशवाणीवरून घोषणा केली की मार्चमध्ये निवडणूका घेतल्या जातील अखेर १६ ते २० मार्च या अवधीत निवडणूका झाल्या इंदिराजींचे सरकार कोसळले व २१ मार्चला राष्ट्रपती बी.डी.जत्ती यांनी आणीबाणी उठवल्याचे जाहीर केले आणि दुसऱ्या दिवशी इतर संस्थांबरोबर संघावरील बंदी उठविण्यात आली.

तुरूंगातून सुटल्यावर बाळासाहेबांचे देशभर उत्त्स्फूर्त स्वागत झाले. संघाच्या आणीबाणीतील कार्याबद्दल लिहीताना दि. इंडियन रिव्हयू , या नियतकालिकाच्या संपादक एम. सी. सुब्रहमण्यम यांनी लिहिले आणीबाणीविरूध्द ज्यांनी संघर्ष केला त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एकदम उठून दिसतो सत्याग्रहाची योजना करणे भारताच्या साऱ्या भागांशी संपर्क ठेवणे, कोणताही बभ्रा होवू न देता चळवळीसाठी पैसा उभारणे , चळवळीच्या संदर्भातील पत्रके सर्वत्र व्यवस्थीत पोहचवणे ही कामे संघाकडून शिकवित असे गौरवाचे उद्‌गार काढले.[८]

१९७७ साली प्रचंड वादळाने आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीला जबरदस्त तडाखा दिला. त्यावादळात २०,००० माणसे मृत्युमूखी पडली शेकडो प्रेते सडत कुजत इस्ततः विखुरली होती. त्यावेळी केलेल्या मदत कार्यामुळे रा.स्व.संघ त्याभागात इतका लोकप्रिय ठरला की साम्यवादी पक्षाच्या स्थानिक शाखेने देखील मदत मागू इच्छिणाऱ्या खेडूताना आपल्याकडे खेचण्यासाठी आपल्या छावणीखालीही आर. एस.एस. असेच नाव दिले होते श्रीमती इंदिरा गांधीनी जेव्हा त्याभागाला भेट दिली तेव्हा फक्त रा.स्व. संघाचे कार्यकर्ते काम करीत असल्याचे पाहुन त्यांची मोठी विचित्र परिस्थिती झाली दि. २७ नोव्हेंबर १९७७ रोजी , समाचार, ने भवदेवारपल्ली खेडेगावातून पाठवलेली बातमी अशी होती, की , आज श्रीमती इंदिरा गांधी वादळग्रस्तांचे सात्वंन करण्यासाठी इथे आल्या पण इथे त्यांना जे दृष्य दिसले त्यामुळे त्यांना आणि त्यांच्याबरोबरच्या इतर कॉंग्रेसनेत्यांना धक्का देणारे ठरले. प्रेते आणि सांगाडे गोळा करून त्यांच्यावर अत्यंसस्कार करण्याचे काम फक्त संघाचे स्वयंसेवकच करीत होते. त्या संपूर्ण भागातल्या कॉंग्रेससेवा दलाचे कोणीही नव्हते.

मद्रासच्या दै. हिंदू या वृत्तपत्राने मदत कार्य करणारे संघ कार्यकर्ते हेच खरे हिरो आहेत असे म्हटले. आंध्र प्रदेशातील सर्वोदय नेते श्री प्रभाकर इतके भारावून गेले होते की. R.S.S. Stand for Realy for Selfless service असे उद्‌गार त्यांनी काढले पुढे रा.स्व. संघाच्या प्रेरणेने वादळग्रस्तांसाठी जेव्हा दिनदयालपूरम् हे आदर्श गाव उभे राहिले तेव्हा आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. चेन्ना रेड्डी यांनी संघकार्यकर्त्यांच्या निष्ठेची आणि सेवावृतीची भरपूर प्रशंसा केली होती.

## • सेवा भारती दिल्ली (१९८०)

१९८० साली दिल्लीला या कामास सुरूवात झाली सध्या दिल्लीतील ८० वस्त्या मध्ये काम चालू आहे बालवाडया, बालबालिका, संस्कार केंद्र शिवण केंद्रे कोचिंग क्लासेस इ. विविध ३७६ लहान मोठे उपक्रम या संस्थेमार्फत चालवले जातात या संस्थेमार्फत दिल्लीत एक वसतीगृह चालवले जाते तेथे ८० विद्यार्थी राहातात दिल्लीत ६५ ठिकाणी शिवण कला वर्ग चालवले जाता टायपिंग व शॉर्टहॅण्डचे चार वर्ग दिल्लीत चालवले जातात संस्थेमार्फत चालणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रीकलच्या पाठयक्रमात २२८ तर इलेक्ट्रॉनिक्सच्या पाठयक्रमास २४१ विद्यार्थी आले होते याशिवाय १०ठिकाणी दवाखाने चालू आहेत मातृछाया या नावाने चालणाऱ्या उपक्रमव्दारे निराधार अपत्यांचे संगोपण करू त्यांना चांगल्या कुटूंबात दत्तक म्हणून दिले जाते. १९९३ या एका वर्षात २६ मुलांना दत्तक म्हणून दिले गेले. संस्थेमार्फत चालणाऱ्या सेवाधाम विद्यामंदिराची जागा ५ एकर आहे त्यात ५२ खोल्या असलेले विद्यामंदिर बांधले आहे १२०० व्यक्ति बसु शकतील एवढया आकाराचे सभागृहही बांधले आहे. देशभरातील वनवासी आणि उपेक्षित बांधवामधून या विद्यामंदिरासाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. तेथील विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षण आणि त्यांच्या जेवणाची व राहाण्याची व्यवस्थाही केली आहे संस्थेमार्फत व्हीडीओ कोच (मोठा स्क्रीन आणि व्हीडीओ टीव्ही , घेतला आहे एकावेळी १००० नागरिक या स्क्रीनवरील टी.व्ही. पाहु शकतात या स्क्रीन टीव्ही माध्यमातून उपेक्षीत वस्त्यांमध्ये शिक्षण संस्कार देणाऱ्या फिल्मस दाखविण्याचा उप्रक्रमही केला जातो यासर्व उपक्रमास भारत सरकारच्या दिल्ली विकास प्राधिकरणामार्फत विविध प्रकारची मदतही मिळत आहे. त्याशिवाय दिल्लीमध्ये सर्वात उत्कृष्ठ सेवा कार्य चालविण्याबद्दल भारत सरकारने सेवा भारती या संस्थेस ५१,००० रूपयांचे पारितोषिक दिले आहे.[१]

बाळासाहेबाची एक दृष्टी होती संघामध्ये प्रात:स्मरण म्हणून काही श्लोक प्रभात शाखेत म्हणण्याची प्रथा काही वर्षानंतर सुरू झाली . धार्मिक परंपरेनुसार चालत आलेल्या श्लोकांची निवड त्यात केली होती. पण कालांतराने बाळासाहेबांनी त्यात बदल करून त्यात बौध्द, जैन, शीख धर्मानुसार मुद्दाम नवीन श्लोक तयार करून घालण्याची कल्पना काढली काही दिवस गेल्यावर त्यात आधुनिक प्रमुख नेत्यांची नावे घालण्यात आली आणि सामाजिक व राजकीय चळवळीतील व्यक्तिचींही दखल घेतली गेली जे जे म्हणून भारताच्या प्रगतीला पोषक होते त्या प्रत्येक क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिंचा समावेश त्यात केला. आर्यभट्ट आणि नागार्जुन यांच्यासारखे वैज्ञानिक , तर चित्रकार रवि वर्मा आणि संगीततज्ञ भातखंडे यांच्यासारखे कलावंत यांनाही त्यात स्थान दिले गेले महात्मा फुले, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. आंबेडकर यांची नावे अंर्तभूत केली गेली श्री. रामकृष्ण, विवेकानंद ,दयानंद, गांधीजी , रविंद्रनाथ यांचा समावेश त्यामध्येच केला गेला होता. एवढयाने भागले नाही रसखान यासारख्या कृष्णभक्त असलेला आणि पारशी समाजातील कॉंग्रेसचे नेते असलेले दादाभाई नौरोजी यांनाही स्थान दिले गेले आणि त्यांची जागा भारतभक्तिस्तोत्र/एकात्मता स्तोत्र या राष्ट्रीयत्वाच्या निदर्शक अशा नावाने घेतली कालानुरूप योग्य ते बदल करणे आणि संघाची भुमिका अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करणे या दिशेने बाळासाहेबांनी टाकलेले हे एक पाऊल होते.

१९८९ साली संघाने डॉक्टर हेडगेवारांची जन्मशताब्दी साऱ्या देशभर भव्य प्रमाणात साजरी केली डॉक्टर हे संघाचे संस्थापक त्याला सारा आकार त्यांनी दिला संघटनेची सुत्रे त्यांनी दिली पण हे करीत असताना त्यांनी त्यामध्ये आपले अस्तित्व कोठेही थोडेसे देखील उरू दिले नाही संघाची ही एवढी विशाल संघटना की जिला आता अनेक पारंब्या फुटल्या आहेत आणि अजूनही फुटतील अशी चिन्हे आहेत तिची उभारणी करणाऱ्या महापूरूषाचे नाव त्याने या जगाचा निरोप घेवून तीस चाळीस वर्षे झाली तरी समाजात कोणाला कळले नव्हते.

अशा या डॉक्टरांची जन्मशताब्दी त्यांच्यानंतर आलेल्या संघातील तिसऱ्या पिढीने, साजरी केली या जन्मशताब्दीचे स्वरूप विशाल होते कारण संघाच्या पंधरा सोळा हजार शाखा भारतात होत्या या जन्मशताब्दीच्या निमित्ताने संघाचे स्वयंसेवक लक्षावधी लोकांपर्यंत पोहचले डॉक्टरांची भव्ये चित्रे उभी करून त्याखाली होय मी म्हणतो हे हिंदु राष्ट्र आहे हे त्यांचे वाक्य ठळक अक्षरात लिहिलेले होते. विजयादशमी हा संघ स्थापनेचा दिवस तर वर्षप्रतिप्रदा हा डॉक्टरंचा जन्मदिन १९८८ या वर्षातील विजया दशमीस जन्मशताब्दीच्या कार्यक्रमांना प्रारंभ झाला आणि १९८९ मधील वर्षप्रतिपदेस संघाच्या देशभरातील आजीमाजी प्रचारकांचे तीन दिवसांचे शिबीर आयोजीत करण्यात आले होते अखिल भारतातून पाच हजार प्रचारक नागपूरमध्ये गोळा झाले होते. तेथे संचलन , दैनदिन कार्यक्रम व डॉक्टरांचे जीवन, संघ व उभे केले होते. शिवाय या कार्यक्रमाच्या निमित्तानं डॉक्टरांच्या जीवनावरील एक लघुपट देखील सुप्रसिध्द दिग्दर्शक राजदत्त यांनी प्रदर्शित केला.

या जन्मशताब्दीचा समारोप नागपूरमध्ये बाळासाहेबांच्या भाषणाने झाला. माणसाचे आंतरिक सामर्थ्य प्रकाशमान होण्यासाठी संकटाचा काळ हे एक वरदान असते सरसंघचालक झाल्यावर दोनच वर्षात आलेल्या आणीबाणीने बाळासाहेबांनी ही संधी दिली. आणि त्यांची उज्वल प्रतिमा समाजासमोर उभी राहिली त्याबळावर नवनवीन क्षेत्रात पदार्पण करण्याचे काळाचे आव्हान त्यांनी स्विकारले या अगोदर सहा सात संस्थाची उभारणी, गुरूजींनी केलीच होती, संघ काही करणार नाही तो फक्त संघटना करेल इतर सारे काही स्वयंसेवक करेल याची प्रचीती आली होती विद्याभारती ,सेवाभारती, कलाभारती, संस्कारभारती, ग्राहक पंचायत, निरनिराळे नियतकालिके ,भारतीय किसान संघ सामाजिक समरसता मंच इतिहास संकलन समिती अशा कित्येक एक संस्था जोमदारपणे उभ्या राहील्या व आखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून घेवू लागल्या समाज जीवनाच्या हर एक क्षेत्रात विधायक दृष्टीने कार्य करण्याचा संघाचा हा प्रयत्न आहे.[१०]

संघाचा इतर क्षेत्रात विस्तार करण्यात १९९०-९१ पर्यंत बाळासाहेबांचे आयुष्य गेले त्यानंतर मात्र त्यांची प्रकृती साथ देईनाशी झाली. त्यांना मधुमेह कित्येक वर्षे होताच त्यत प्रोस्टेटची शस्त्रक्रिया करावी लागली आणि पक्षघाताचा झटकाही आला. १९९२ मध्ये त्यांचे धाकटे बंधु भाऊराव यांनी जगाचा निरोप घेतला त्याचा परिणाम मात्र बाळासाहेबाच्या मनावर फार मोठा झाला. तरीही ते माणसांच्या भेटी गाठी घेत ते बोलू शकत नव्हते पण आलेल्या व्यक्तिचे बोलणे ते ऐकत आपण आपल्या पदाला न्याय देवू शकत नाही हे बाळासाहेबाच्या ध्यानात आले.

नागपूरच्या रेशीमबागेत अखिल भारतीय प्रतिनिधी सभा भरली होती ११म र्च १९९४ या दिवशी अचानक सकाळी साडेदहा वाजता बाळासाहेब व्यासपीठावर आले व त्यांना घोषणा केली की आता या क्षणापासून पुढे राजेंद्रसिंहजी तथा रज्जुभैय्या हे आपले सरसंघचालक राहतील हा एक अतिशय उचित निर्णय बाळासाहेबांनी पुर्ण निर्लिप्त वृत्तीने घेतला सरसंघचालक विकलांग झाले तरी अखेरच्या क्षणापर्यंत त्या पदावर असावेत असा दंडक पडू नये यासाठी हे पाऊल त्यांनी उचलले ही घोषणा केली त्यापासून एक जेष्ठ स्वयंसेवक ही त्यांची भूमिका राहीली संघाच्या उत्सवात डॉक्टर व गुरूजी या दोघांचीच छायाचित्रे लावली जावीत ही त्यांची सूचनाही महत्वाची होती.[११]

डॉक्टरांनी आपल्या अखेरच्या आजारात संघशिक्षावर्गामध्ये हिंदुराष्ट्राचे एक छोटेसे रूप पाहीले. आणि आपल्या जिर्णकुडीचा त्याग केला बाळासाहेबांनी एक स्वयंसेवक देशाचा पंतप्रधान झालेला पाहीला आणि १७ जून १९९६ या दिवशी इहलोकांचा निरोप घेतला. गुरूजींनी आदेश देवून ठेवला होता की, आपले कोणत्याही स्वरूपातील स्मारक उभारले जावू नये . बाळासाहेबांनी आदेश देवून ठेवला की नागपूरामधील इतर नागरिकांचा होतो त्या गंगाघाट स्मशान भूमीमध्ये आपला अंत्यसंस्कार केला जावा. रेशीमबाग संघस्थानावर सरसंघचालकांचा अत्यंसंस्कार होण्याची प्रथा पडू नये यासाठी त्यांनी ही दक्षता घेतली.[१२]

# • संदर्भ सूची •

## प्रकरण चौथे


१. डॉ. वि. रा. करंदीकर - तीन सरसघंचालक , स्नेहल - प्रकाशन, प्रथमावृत्ती २१ फेब्रु ९९ पृष्ठ ५५०
२. कित्ता - पृष्ठ ५५१
३. कित्ता - पृष्ठ ५५२
४. कित्ता - पृष्ठ ५५२
५. कित्ता - पृष्ठ ५५३
६. कित्ता - पृष्ठ ५५४
७. कित्ता - पृष्ठ ५५७
८. कित्ता - पृष्ठ ५५९,५६०,५६१
९. विवेक अमृतपथ व कोल्हापूर जिल्हा बौध्दिक पत्रक जुलै १९९४ पृष्ठ ६४
१०. अशी ही एक जन्मशताब्दी यापुस्तकातून व करंदीकर पृष्ठ ५७०, ५७१, ५७२
११. डॉ. वि. रा. करंदीकर - तीन सरसघंचालक , स्नेहल - प्रकाशन, प्रथमावृत्ती २१ फेब्रु ९९ पृष्ठ ५७६
१२. कित्ता - पृष्ठ ५७६, ५७७